# घटक : १६ → संसद

* संघराज्याच्या सरकारची कायदे बनवणारी संस्था – दुसरे नाव - वेस्टमिनिस्टर पद्धतीचे सरकार
(लंडन मध्ये वेस्टमिनिस्टर येथे ब्रिटनची संसद)

भाग → ५ कलम ७९ ते १२३

संसदेचे संघटन, संरचना, कालावधी, अधिकारी, प्रक्रिया, अधिकार

## संसदेचे संघटन

संसदेचे तीन भाग - राष्ट्रपती, राज्यांची परिषद, लोकांचे सभागृह

१९५४ मध्ये राज्यसभा व लोकसभा नावे स्विकारली

अमेरिकेच्या प्रणालीपेक्षा ब्रिटनच्या प्रणालीचे अनुकरण.

ब्रिटन → राजा किंवा राणी, हाऊस ऑफ लॉर्डस (वरिष्ठ), हाऊस ऑफ कॉमन्स (कनिष्ठ)

अमेरिका → अध्यक्ष, सिनेट (वरिष्ठ), हाऊस ऑफ रिप्रेझेंटेटिव्ह (कनिष्ठ)

## दोन्ही गृहांची रचना :

### राज्यसभा

→ कमाल सदस्य संख्या २५० (पैकी २३८ - राज्यांचे / कें.प्रदेशांचे प्रतिनिधी (अप्रत्यक्ष) + १२ राष्ट्रपती नामनिर्देशित)

सध्या २४५ - (२२९ राज्यांचे + ४ कें.प्रदेशांचे + १२ नामनिर्देशीत)

प्रत्येक राज्याला व कें.प्रदेशास किती प्रतिनिधीत्व द्यावे → ४थे परिशिष्ट.

① राज्यांचे प्रतिनिधीत्व

→ राज्य विधान सभेतील निर्वाचित सदस्य निवडतात.
→ प्रमाणशीर एकल संक्रमणीय मतदान तत्व.
→ जागा - राज्याच्या लोकसंख्येच्या आधारावर
→ उ.प्रदेशचे ३१ सदस्य तर त्रिपुराचा १ सदस्य (अमेरिकेत प्रत्येक राज्याचे २ (५० x २ = १००))

② संघराज्य प्रदेशांचे प्रतिनिधीत्व

→ अप्रत्यक्ष पद्धत - विशेष निर्वाचन मंडळाची निर्मिती.
→ प्रमाणशीर एकल संक्रमणीय मतदान तत्व.
→ फक्त दिल्ली व पुदुच्चेरी यांनाच प्रतिनिधीत्व.

③ नामनिर्देशीत सदस्य.

→ कला, साहित्य, विज्ञान आणि समाजसेवा याबाबत विशेष ज्ञान किंवा अनुभव असणाऱ्या १२ व्यक्तींना राष्ट्रपती नामनिर्देशीत करतो.

### लोकसभा

कमाल सदस्य संख्या - ५५२

यापैकी - ५३० राज्यांचे
२० संघराज्य प्रदेशाचे
२ ॲंग्लो इंडियन्स - नामनिर्देशीत.

Scanned by CamScanner

अँग्लो इंडियन म्हणजे काय?

ज्या व्यक्तीचे वडील किंवा वडिलांच्या पूर्वजांपैकी पुरुष युरोपियन वंशाचा आहे किंवा होता आणि ती व्यक्ती भारतीय क्षेत्रात वास्तव्य करीत असून, या क्षेत्रात राहणाऱ्या आईवडिलांपोटी त्याचा जन्म. (तात्पुरत्या कारणासाठी भारतात राहणाऱ्यांचा यात समावेश होत नाही.)

→ सध्या लोकसभेत ५४५ सदस्य – ५३० - राज्यांचे १३ संघराज्य प्र. + 2 अँग्लो इंडियन
① रिचर्ड हे - केरळ ② जॉर्ज बेकर - प. बंगाल.

राज्यांचे प्रतिनिधीत्व

क्षेत्रीय मतदारसंघ - प्रत्यक्षपणे – सार्वत्रिक प्रौढ मतदार तत्व - गुप्त मतदान पद्धती.
६१वी घ.दु - १९८८ अन्वये १९८९ पासून वय २१वरून १८

संघराज्य प्र. प्रतिनिधीत्व

प्रतिनिधी निवडण्याची प्रक्रिया ठरविण्याचे अधिकार संसदेला.
त्यातून सुद्धा थेट निवडणुकीनेच.

नामनिर्देशीत

अँग्लो इंडियन समाजास पुरेसे प्रतिनिधीत्व मिळाले नसेल तर राष्ट्रपती निवडतो.

निवडणुकीची पद्धत.

① क्षेत्रिय मतदारसंघ ⇒ लोकसंख्येच्या आधारावर मतदारसंघाची रचना. व जागांचे प्रमाण.
सर्व राज्यांना समान नियम (६० लाख पेक्षा कमी → अपवाद)

② प्रत्येक जनगणनेनंतर पुनर्रचना ⇒ ४२वी घ.दु - १९७६ नुसार १९७१ ची जनगणना आधारभूत
२००० पर्यंत.
८४ वी घ.दु २००१ नुसार १९९१ —॥—
८७ वी घ.दु २००३ नुसार २००१ —॥—

③ SC/ST साठी जागांचे आरक्षण ⇒ सुरुवातीला आरक्षण १९६०पर्यंत.
प्रत्येक वेळी १० वर्षांनी वाढविले.
२००९ नुसार आता आरक्षण २०२०पर्यंत.
वेगळे मतदार संघ नसतात.
SC व ST उमेदवारास सर्वसाधारण जागा लढविता येते.

④ क्षेत्रीय प्रतिनिधीत्व प्रणाली ⇒ प्रत्येक मतदार संघातून एकच प्रतिनिधी.
एकसदस्यीय मतदारसंघ म्हणतात.

Scanned by CamScanner

## कालावधी

**राज्यसभा** ⇒ स्थापना १९५२ — स्थायी सभागृह.
विसर्जित होत नाही दर दोन वर्षांनी १/३ सदस्य निवृत्त होतात.
त्या जागी तेवढेच नियुक्त होतात.
सदस्यांचा कालावधी ६ वर्षे — कितीही वेळा नियुक्तीसाठी पात्र.
पहिल्या गटाचा कोणाचा कार्यकाळ संपेल हे लॉटरी पद्धतीने ठरवले.

**लोकसभा** —
सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या बैठकीपासून ५ वर्षे त्यानंतर आपोआप विसर्जित.
कालावधीपूर्वी विसर्जित करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना.
राष्ट्रीय आणीबाणीच्या काळात संसदीय कायदा करून कार्यकाळ कितीही वेळा एका वेळी एका वर्षाने वाढवता येतो. मात्र आणीबाणी संपल्यानंतर ६ महिन्यांपेक्षा अधिक राहू शकत नाही.

**सदस्यांची पात्रता**

① भारताचा नागरिक
② नोंदणीकृत मतदार असला पाहिजे
③ वय २५ ⟶ लोकसभा
वय ३० ⟶ राज्यसभा.

**अपात्रता**

① संघराज्य किंवा राज्य सरकार मध्ये लाभाच्या पदावर
② अस्थिर मनाची असेल व न्यायालयाने तसे घोषित केले असेल.
③ भारताचा नागरीक नसेल

लोकप्रतिनिधी कायदा १९५१ नुसार

① निवडणुकांसंबंधी गुन्ह्याबद्दल दोषी / निवडणुकीत भ्रष्टाचाराचा अवलंब केल्याबद्दल दोषी असता कामा नये.
② दोन किंवा अधिक वर्षांचा तुरुंगवास असलेल्या कोणत्याही अपराधात तो दोषी नसावी (प्रतिबंधक स्थानबद्धते नुसार स्थानबद्ध असल्यास अपवाद नाही)
③ सरकारी कंत्राटे, कामे, सेवा यामध्ये हीत गुंतलेले नसावे
④ निवडणूक कालावधीतील खर्चाचा पूर्तीचा अहवाल दिल्यास
⑤ सरकारचा किमान २५% हिस्सा असलेल्या निगमामध्ये संचालक नसावी.
⑥ भ्रष्टाचारावरून सरकारी सेवेतून काढून टाकलेले नसावे.
⑦ अस्पृश्यता, हुंडा, सती सामाजिक गुन्ह्यात शिक्षा झालेली नसावी.

**पक्षांतराच्या कारणावरून अपात्रता**

पक्षांतर कारणावरून अपात्र ठरत असेल तर संसद सदस्य राहण्यास अपात्र ठरते.
खालील परिस्थितीत पक्षांतर विरोधी कायद्यानुसार अपात्र ठरतो.

Scanned by CamScanner

① ज्या पक्षातर्फे निवडून आला आहे त्या पक्षाचे सदस्यत्व स्वेच्छेने सोडतो.
② त्याच्या राजकीय पक्षाने दिलेल्या आदेशाविरुद्ध मतदान करतो./तटस्थ राहतो.
③ अपक्ष किंवा स्वतंत्र म्हणून निवडून आलेला सदस्य राजकीय पक्षात जातो.
④ नामनिर्देशित सदस्य सहा महिन्याच्या कालावधीनंतर पक्षात जातो.

ह्या अपात्रतेच्या तरतुदी परिशिष्ट १० मध्ये येतात त्या संदर्भात निर्णय लोकसभा अध्यक्ष/ राज्यसभेचा अध्यक्ष देतो (राष्ट्रपती नव्हे) – त्यांच्या निर्णयाचे न्यायालयीन पुनर्विलोकन होऊ शकते. – (1992 - सर्वोच्च न्याया. निर्णय)

जागा रिक्त होणे (I) दुहेरी सदस्यत्व.
① एक व्यक्ती एका वेळी दोन्ही सभागृहाची सदस्य असू शकत नाही.
लोकप्रतिनिधी कायदा - 1951
① दोन्ही सभागृहात निवडून आली तर कोणत्या गृहात काम करायचे १० दिवसांचे आत कळवावे. (अन्यथा राज्य सभेतील जागा रिक्त होते.)
② एका गृहाचा सदस्य दुसऱ्या गृहात निवडून आला तर पहिल्या गृहातील जागा रिक्त
③ जर व्यक्ती एका गृहातील दोन जागांवर निवडून आली तर त्या व्यक्तीने त्यापैकी एक जागा निवडावी अन्यथा दोन्ही रिक्त होतात.
त्याचप्रमाणे एक व्यक्ती एकाच वेळी संसद सदस्य व राज्य विधिमंडळाचा सदस्य असू शकत नाही. जर त्या व्यक्तीने १४ दिवसांच्या आत राज्य विधिमंडळातील जागेचा राजीनामा दिला नाही तर त्याची संसदेतील जागा रिक्त होते.

(II) अपात्रता
(III) राजीनामा. राजीनामा लोकसभा सभापती/ राज्यसभा अध्यक्षाकडे.
स्वीकृत झाल्यावर पद रिक्त.
अध्यक्ष/ सभापती राजीनामा नाकारू शकतात.

(IV) अनुपस्थिती – परवानगीशिवाय सदस्य ६० दिवस सर्व बैठकांना अनुपस्थित राहिला तर सभागृह सदस्याची जागा रिक्त घोषित करू शकते.
हा कालावधी मोजताना सलग ४ दिवस सभागृह बरखास्त/ स्थगित केल्याचे दिवस मोजणार नाहीत.

(V) इतर — ① न्यायालयाने निवडणूक अवैध ठरविली.
② सभागृहाने काढून टाकले.
③ राष्ट्रपती किंवा उपराष्ट्रपती पदी निवडून आला.
④ राज्यपाल पदी नियुक्ती झाली.

→ शपथ = शपथ घेण्यापूर्वी गृहात उपस्थित राहून मतदान केले तर ५०० रु दंड.

Scanned by CamScanner

## वेतन व भत्ते -

वेतन २०१० → १६००० हून → ५०,०००।—

मतदारसंघ भत्ता → २०,००० हून → ४५,०००।—

दैनिक भत्ता १००० हून → २०००।—

कार्यालयीन खर्च २०,००० हून → ४५,०००।—

१९५३ मध्ये सदस्यांचे वेतन व भत्ते कायदा.

## संसदेचे पदाधिकारी

### ① लोकसभेचा सभापती :

पहिल्या बैठकीनंतर लोकसभा आपल्या सदस्यांपैकी एकाची सभापती म्हणून नियुक्त करते.

पद रिक्त झाल्यावर दुसऱ्या सदस्याची नियुक्त.

निवडणुकीचा दिनांक = राष्ट्रपती ठरवतो.

कार्यकाल - लोकसभेच्या कार्यकालपर्यंत

खालील तीन परिस्थितीत पद आधी सोडावे लागते.

① लोकसभेचा सदस्य राहिला नाही तर
② उपसभापतीकडे राजीनामा सादर केला असेल तर
③ सर्व सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करुन पदावरुन हटवले (१४ दिवसपूर्वसूचना)

ज्यावेळी असा ठराव गृहाच्या विचाराधीन असतो त्यावेळी सभापती उपस्थित असला तरी गृहाच्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी राहू शकत नाही- मात्र बाजू मांडू शकतो गृहाच्या कामकाजात सहभागी होवू शकतो पहिल्या टप्प्यात मतदान करु शकतो परंतु समान मते झाल्यास मतदान करु शकत नाही.

लोकसभा विसर्जित होते त्यावेळी पदावरुन जात नाही नवीन लोकसभेची बैठक होईपर्यंत पदावर

### भूमिका - 

लोकसभेचा प्रमुख /लोकसभेचा प्रतिनिधी.

गृहाचा प्रमुख प्रवक्ता.

संसदीय बाबीमध्ये निर्णय अंतिम.

### अधिकार व कार्य

① गृहात अनुशासन आणि योग्य वातावरण ठेवणे.
② सभागृहात घटनेचा अन्वयार्थ लावण्याचा अंतिम अधिकार.
③ गृहाची बैठक स्थगित करतो किंवा गृह बरखास्त करतो (गणपूर्ती होत नसेल तर)

गणपूर्ती म्हणजे ⟹ गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या एक दशांश उपस्थिती.

④ पहिल्या टप्प्यात मतदान करीत नाही मात्र निर्णायक मत देवू शकतो.

Scanned by CamScanner

④ दोन्ही गृहाच्या संयुक्त बैठकीच्या अध्यक्षस्थानी - एखाद्या विधेयकाबाबत दोन गृहात कोंडी फोडण्यासाठी राष्ट्रपती अशी बैठक बोलावतो.
⑤ एखादे विधेयक अर्थ विधेयक आहे किंवा नाही ते ठरवतो. व प्रमाणित करतो.
⑥ परिशिष्ट १० च्या तरतुदीमुळे - उद्भवणाऱ्या अपात्रतेच्या प्रश्नासंबंधी निर्णय देतो.
⑦ आंतर संसदीय संघटनेच्या भारतीय संसदीय गटाचा पदसिद्ध अध्यक्ष :
देशातील कायदेमंडळाच्या मुख्याधिकाऱ्यांच्या परिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष.
⑧ लोकसभेच्या सर्व संसदिय समित्यांचे अध्यक्ष नियुक्त करतो कामकाजाचे पर्यवेक्षण करतो.
स्वतः व्यवहार सल्लागार समिती, नियम समिती, सर्वसाधारण उद्देश समिती → अध्यक्ष

* पदावधीची सुरक्षितता → पदावरुन दूर करण्यासाठी लोकसभेमध्ये पूर्ण बहुमताचा ठराव (एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने) संमत व्हावा लागतो - साध्या बहुमताचा नव्हे.
ठरावाला ५० सदस्यांचा पाठिंबा आवश्यक
* वेतन व भत्ते → संसदेकडून निश्चिती - संचित निधीतून — वार्षिक मतदानावर अवलंबून नसतो.
* ज्येष्ठताक्रम → उच्च स्थान - भारताच्या मुख्य न्यायाधीशाबरोबर - ७ वे स्थान.
ब्रिटनमध्ये सभापती हा कायद्याने पक्षाशी संबंधित नसतो. पक्षाचा राजीनामा देतो व तटस्थ राहतो.

## ② लोकसभेचा उपसभापती

सदस्य आपल्यापैकी एकाची उपसभापती पदी निवड.
सभापती उपसभापतीची निवडणुकीचा दिनांक ठरवतात.
कार्यकाल ⇒ लोकसभेच्या कार्यकालापर्यंत

→ पद रिक्त होते. ① लोकसभेचा सदस्य राहिला नाही तर
② सभापतीला राजीनामा दिला तर
③ सर्व सदस्य संख्येच्या बहुमताचा ठराव करुन पदच्युत केले तर (१४ दि. पूर्वसूचना)

सभापतीचे पद रिक्त असताना उपसभापती सभापतीची कामे करतो. सभापती अनुपस्थित असेल तर - संयुक्त बैठकीचे अध्यक्षस्थान.
उपसभापती हा सभापतीपेक्षा दुय्यम नसतो.
त्याला पदावरुन कमी करण्याचा ठराव विचाराधीन असतो तेव्हा अध्यक्षपदी बसू शकत नाही.

वेतन व भत्ते ⇒ संचित निधीतून.
१० व्या लोकसभेपर्यंत - सभापती व उपसभापती - सत्तारुढ पक्षाचे
* ११ व्या पासून उपसभापती - विरोधी पक्षाच्या सदस्यास बहाल करतात.

ही दोन्ही पदे - १९२१ - अस्तित्वात - (१९१९ च्या कायद्याने)
१९२१ मध्ये — गव्हर्नर जनरल फ्रेडरिक व्हाईट → सभापती
सच्चिदानंद सिन्हा → उपसभापती
१९२५ - विठ्ठलभाई जे पटेल — पहिले भारतीय / निर्वाचित सभापती

Scanned by CamScanner

लोकसभेचे पहिले सभापती व उपसभापती जी.व्ही. मावळणकर आणि अनंतशयनम अय्यंगार

मावळणकर संविधान सभेचे तसेच हंगामी संसदेचे सभापती

तसेच १९४६ ते १९५६ = १० वर्षे.

## लोकसभेच्या प्रमुखांचा गट

सभापती क्रमाने १० जणांचा गट तयार करतो.

सभापती व उपसभापती यांच्या अनुपस्थितीत यापैकी एक गृहाच्या अध्यक्षपदी

अध्यक्ष असताना सभापतीचे अधिकार

ज्यावेळी या गटातील व्यक्तीही अनुपस्थित असते तेव्हा सदस्य ठरवतील ती व्यक्ती अध्य[क्ष]

## हंगामी सभापती

अगोदरच्या लोकसभेचा सभापती नव्याने निवडून आलेल्या लोकसभेच्या पहिल्या बैठकीपूर्वी पायउतार होतो. त्यावेळी राष्ट्रपती लोकसभेच्या सदस्यांपैकी एकाची हंगामी सभापती म्हणून नियुक्ती करतो. - तसेच शपथ देतो (साधारण पणे ज्येष्ठ व्यक्ती)

तो नव्याने निवडून आलेल्या लोकसभेच्या पहिल्या बैठकीच्या अध्यक्षस्थानी.

नवीन सदस्यांना शपथ देतो.

## राज्यसभेचा अध्यक्ष

उपराष्ट्रपती - पदसिद्ध अध्यक्ष.

पदावरून हटविले तर तो अध्यक्ष राहत नाही.

अधिकार व कार्य लोकसभेच्या सभापती प्रमाणेच. फक्त दोन अधिकार नसतात.

① अर्थविधेयक ठरविण्याचा

② संयुक्त बैठकीच्या अध्यक्षस्थानी नसतो.

* लोकसभेचा सभापती गृहाचा सदस्य असतो राज्यसभेचा अध्यक्ष सदस्य नसतो. पहिल्या टप्प्यात मतदान करीत नाहीत - मात्र निर्णायक मत देतो.

* ज्यावेळी त्याला काढण्यासंबंधी ठराव विचाराधीन असतो त्यावेळी अध्यक्ष नसतो. उपस्थित राहू शकतो पण मतदान करू शकत नाही.

## राज्यसभेचा उपाध्यक्ष

सदस्यांपैकी एकाची उपाध्यक्षपदी निवड

उपराष्ट्रपती प्रभारी राष्ट्रपती म्हणून काम पाहत असताना किंवा सभागृहात अनुपस्थित असताना उपाध्यक्ष अध्यक्षाचे काम पाहतो.

पद रिक्त होते -
① सदस्य राहिला नाही.
② अध्यक्षाला राजीनामा दिला
③ एकूण सदस्य संख्येच्या बहुमताने ठराव (१४ दिवस पूर्वसूचना)

इतर सर्व बाबी अध्यक्षाप्रमाणे - अध्यक्ष उपस्थित असताना भूमिका सामान्य सदस्यासारखी

Scanned by CamScanner

## राज्यसभेच्या उपप्रमुखांचा गट

अध्यक्ष उपप्रमुखांचा एक गट नामनिर्देशित करतो.
अध्यक्ष / उपाध्यक्षांच्या अनुपस्थित ⟶ अध्यक्ष म्हणून
गटातील सदस्यही अनुपस्थित असतील ⟶ सदस्य ठरवतील तो.

## संसदीय सचिवालय

सचिवालयीन कर्मचारी.
संसद → भरती आणि सेवाशर्ती नियम.
प्रत्येक गृहाच्या सचिवालयाच्या प्रमुखपदी महासचिव.

## संसदेतील नेते

① गृहाच्या नेता :
लोकसभेत • गृहाचा सदस्य असेल तर पंतप्रधान.
• अन्यथा पंतप्रधानाने नामनिर्देशित केलेला सदस्य.
राज्यसभेत : पंतप्रधाने नामनिर्देशित केलेला मंत्री.

② विरोधी पक्ष नेता

• गृहाच्या एक दशांश पेक्षा कमी जागा नसलेल्या सर्वात मोठ्या विरोधी पक्षाच्या नेत्यास विरोधी पक्ष नेता म्हणून मान्यता.
• विधायक टिका करणे } कामे.
व पर्यायी सरकार देणे }
• १९७७ मध्ये वैधानिक मान्यता. (दोन्ही गृहातील)
• दोघांना कॅबिनेट मंत्र्याचा दर्जा.

③ प्रतोद

घटनेत उल्लेख नाही, गृहाच्या नियमात व संसदीय कायद्यात उल्लेख नाही.
सभागृहाचा नेता } घटनेत नाही पण ——— ॥ ——— आहे.
विरोधी पक्ष नेता }
गृहातील नेत्याला सहाय्य करण्यासाठी राजकीय पक्ष त्याची नियुक्ती करतात.
सदस्यांच्या वर्तणुकीवर लक्ष ठेवणे.
त्याचे सल्ले सदस्यांनी पाळणे अपेक्षित.

## संसदेची अधिवेशने

दोन अधिवेशनातील कालावधी ६ महिन्यांपेक्षा जास्त नसतो.
राष्ट्रपती - दोन्ही गृहांची अधिवेशने बोलावतो
वर्षातील तीन १) अर्थसंकल्पीय अधिवेशन (फेब्रु ते मे)
२) पावसाळी ——॥—— (जुलै ते सप्टे)
३) हिवाळी ——॥—— (नोव्हे ते डिसें)

Scanned by CamScanner

⇒ संसदेचे अधिवेशन म्हणजे गृहाच्या पहिल्या बैठकीपासून सत्र समाप्ती पर्यंतचा कालावधी. ह्या काळात रोज बैठक.

## तहकूब करणे -

प्रत्येक दिवशी दोन बैठका - सकाळी ११ ते १ - सकाळ सत्र
दुपारी २ ते ६ - भोजनोत्तर सत्र

संसदेची बैठक तहकुबीने किंवा अनिश्चित काळ पर्यंत तहकुबीने किंवा सत्र समाप्ती करून किंवा विसर्जित करून (लोकसभेच्या बाबतीत) संपविता येते.
तहकुबीने काही तास, दिवस, आठवडे कामकाज तहकूब केले जाते.

## अनिश्चित काळपर्यंत तहकूब.

अनिश्चित काळासाठी थांबविलेली बैठक - पुढच्या बैठकीची तारिख नमुद न करता.
हा अधिकार सभापती / अध्यक्षाला.
त्याला वाटल्यास पुन्हा केव्हाही गृहाची बैठक बोलावू शकतो.

## सत्र समाप्ती / सत्रावसान

अधिवेशन ~~चालू~~ पार पडल्यानंतर सभापती / अध्यक्ष गृह अनिश्चित काळापर्यंत तहकूब करतो. नंतर काही दिवसात राष्ट्रपती अधिवेशन समाप्तीची घोषणा करतो.
· अधिवेशन चालू असताना राष्ट्रपती सत्रावसान करू शकतो.

गृहातहकुबी ⟹ बैठक संपते, अधिवेशन नाही.
घोषणा - अध्यक्ष
कामकाजावर परिणाम नाही.

सत्रावसान ⟹ बैठक तसेच अधिवेशनही संपते.
घोषणा - राष्ट्रपतीकडून.
कामकाजावर परिणाम नाही.

## लोकसभेचे विसर्जन -

① पाच वर्षांचा कार्यकाल संपल्यावर
② राष्ट्रपतीच्या मर्जीने

लोकसभा विसर्जित केल्याने विधेयकाबाबत तरतुदी:
① लोकसभेतील प्रलंबित विधेयक (लोकसभेत मांडलेले / राज्यसभेने पाठवलेले) लोप पावते.
② लोकसभेने संमत केलेले पण राज्यसभेत प्रलंबित ⟶ लोप पावते.
③ विधेयकाबाबत दोन्ही गृहात मतभेद - दोन्ही सभागृहात संमत झालेले नसेल व त्यावर उपाय म्हणून लोकसभा विसर्जित होण्यापूर्वी संयुक्त बैठकीची सूचना जारी केली असेल तर असे विधेयक लोप पावत नाही.

Scanned by CamScanner

(5) राज्यसभेत प्रलंबित आणि लोकसभेत संमत न केलेले — लोप पावत नाही.
(6) दोन्ही गृहाकडून संमत राष्ट्रपती मान्यतेसाठी प्रलंबित — " —
(7) ——— " ——— ने पुनर्विचारार्थ पाठविलेले — " —

## कामकाजासंबंधी बाबी

### गणपूर्ती किंवा गणसंख्या :

गृहाचे कामकाज चालविण्यासाठी किमान आवश्यक सदस्यसंख्या.
एकूण सदस्य संख्येच्या एक दशांश (अध्यक्ष धरून)
लोकसभेत = 55
राज्यसभेत = 25

### गृहातील मतदान

(1) चर्चा संपल्यावर सभापती प्रश्न गृहापुढे ठेवतील आणि ठरावाच्या बाजूने मतदान करणाऱ्यांनी होय व विरुद्ध मतदान करणाऱ्यांनी नाही व्यक्त करण्यास सांगेल

### संसदेतील भाषा -

⇒ कामकाजासाठी हिंदी व इंग्रजीचा वापर
⇒ अध्यक्ष सदस्याला मातृभाषेतून बोलण्याची परवानगी देऊ शकतो.
⇒ दोन्ही गृहात तात्काळ भाषांतराची सोय.

### मंत्र्यांचे व महान्यायवाद्याचे अधिकार

→ गृहाच्या सदस्यांव्यतिरिक्त प्रत्येक मंत्र्याला आणि भारताच्या महान्यायवाद्याला दोन्ही गृहाच्या कामकाजात / संयुक्त बैठकीच्या कामकाजात / सदस्य असलेल्या संसदीय समित्यांच्या कामकाजात सहभागी होण्याचा व आपले म्हणणे मांडण्याचा अधिकार. मात्र मतदानाचा अधिकार (मंत्र्यांच्या बाबतीत स्वतःचे गृह सोडून) नाही.
(यामध्ये कोणत्याही गृहाचा सदस्य नसलेला मंत्रीदेखील सहभागी होऊ शकतो.)

### लेमडक (पांगळे) अधिवेशन

नवीन निवडणूक झाल्यावर विद्यमान लोकसभेच्या शेवटच्या अधिवेशनाला लेम-डक (पांगळे) अधिवेशन म्हटले जाते. नवीन लोकसभेत निवडून न आलेल्या सदस्यांना लेमडक म्हणतात.

## संसदीय कामकाजाच्या पद्धती :

### (1) प्रश्नोत्तराचा तास :

प्रत्येक संसदीय ~~पहिल्या~~ बैठकीचा पहिला तास.
सदस्य प्रश्न विचारतात मंत्री उत्तरे देतात.

Scanned by CamScanner

## प्रश्नांचे प्रकार

① तारांकित प्रश्न - तोंडी उत्तर अपेक्षित / पुरक प्रश्न विचारले जाऊ शकतात.

② अतारांकित प्रश्न - लिखित उत्तर द्यावे लागते / पुरक प्रश्न विचारले जात नाही.

③ अल्प सूचनेचे प्रश्न - दहा दिवसापेक्षा कमी दिवसांची सूचना देवून विचारलेले प्रश्न.

मंत्र्याच्यातिरिक्त खाजगी सदस्यांनाही प्रश्न विचारले जाऊ शकतात.

तारांकित — हिरव्या

अतारांकित — पांढऱ्या

अल्पसूचनेचे - फिक्कट गुलाबी

खाजगी सदस्यांना - पिवळ्या रंगात.

## ② शून्य प्रहर - १९६२ पासून सुरू

कोणतीही पूर्वसूचना न देता मुद्दा उपस्थित करण्यासाठी सदस्यांना उपलब्ध असलेला एक अनौपचारिक मार्ग.

प्रश्नोत्तराच्या तास संपल्यावर लगेच सुरू होतो.

त्यानंतर विषयपत्रिकेनुसार कामकाज सुरू होते.

## ③ ठराव / सूचना / प्रस्ताव

अध्यक्षांच्या संमतीने मांडलेल्या ठरावाशिवाय कोणत्याही सार्वजनिक महत्वाच्या मुद्यावर चर्चा होवू शकत नाही.

ठरावाचे मुख्य ३ प्रकार

① मुळ प्रस्ताव : महत्वाच्या विषयावरील स्वतंत्र स्वयंपूर्ण प्रस्ताव.

② पर्यायी प्रस्ताव - मुळ प्रस्तावाला पर्यायी प्रस्ताव - संमत झाल्यास मुळ प्रस्तावाची जागा -

③ उपप्रस्ताव - स्वतंत्ररित्या अर्थ नसतो - मुळप्रस्ताव किंवा गृहाचे कामकाज यांचा संदर्भ असल्याशिवाय उपप्रस्ताव मांडता येत नाही.

प्रकार - ① पुरक प्रस्ताव - व्यवहाराच्या कामकाजासाठी

② मुळ प्रस्तावाऐवजी प्रस्ताव.

③ दुरुस्ती प्रस्ताव.

## ④ समाप्ती सूचना

विषयावरील चर्चा मध्येच समाप्त करण्यासाठीची सूचना :

सूचना मान्य झाल्यास चर्चा थांबते व विषयावर मतदान होते.

समाप्ती सूचनेचे चार प्रकार.

Scanned by CamScanner

① सर्वसाधारण समाप्ती :- पुरेशी चर्चा झालेली आहे आता मतदान घेण्यात यावे अशी सूचना एखादा सदस्य मांडतो.

② भागनिहाय समाप्ती - विविध कलमे किंवा लोकलक्ष्य करणारे भाग पाडले जातात. प्रत्येक भाग पूर्ण विषय समजून चर्चा.

③ कांगारू समाप्ती - महत्त्वाच्या कलमावर चर्चा होते व मतदान होते. मधल्या कलमावर चर्चा न होता विधेयक संमत होते.

④ गिलोटीन समाप्ती - चर्चेसाठी राखून ठेवलेला वेळ संपल्यामुळे चर्चा केलेल्या मुद्यांबरोबरच चर्चा न केलेले मुद्देसुद्धा मतदानास टाकले जातात - त्यांस गुंडाळून येणे किंवा गिलोटीन.

## ⑤ हक्कभंग प्रस्ताव

मंत्र्याद्वारा खोटी किंवा विपर्यस्त माहिती दिली जाते त्यावेळी सदस्य किंवा गृहाच्या विशेषाधिकाराचा भंग होतो. त्यावेळी सदस्य हक्कभंग प्रस्ताव मांडतात.
मंत्र्यावर टीका / दोषारोप करणे हा उद्देश.

## ⑥ लक्षवेधी सूचना

सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाच्या तातडीच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे आणि त्याबाबत त्यांच्याकडून खात्रीशीर माहिती मिळविणे यासाठी सदस्य संसदेमध्ये लक्षवेधी सूचना मांडतात - ही पद्धत १९५४ पासून.
शून्य प्रहराचा कामकाज प्रक्रियेच्या नियमामध्ये उल्लेख नाही - लक्षवेधी सूचनेचा आहे.

## ⑦ स्थगन प्रस्ताव

सार्वजनिक महत्त्वाच्या विशिष्ट बाबींकडे ~~मंत्र्यांचे~~ गृहाचे लक्ष वेधण्यासाठी स्थगन प्रस्ताव संसदेत मांडला जातो. त्यासाठी ५० सदस्यांचे समर्थन आवश्यक.
सरकारवर टीका असल्याने - लोकसभेत वापर (राज्यसभेत नाही.)
चर्चा - दोन तास तीस मिनिटे.
स्थगन प्रस्ताव मांडण्यावर बंधने -
① मुद्दा सार्वजनिक दृष्ट्या महत्त्वाचा मुद्दा असला पाहिजे.
② एकापेक्षा जास्त मुद्दे असता कामा नये.
③ विशिष्ट घटनेपुरता सिमित असला पाहिजे.
④ विशेषाधिकाराचा प्रश्न उपस्थित करता कामा नये.
⑤ चर्चिलेल्या गेलेल्या मुद्यावर असता कामा नये.
⑥ न्यायालयात प्रलंबित असलेला मुद्दा असता कामा नये.

Scanned by CamScanner

⑧ **अविश्वासाचा प्रस्ताव**

लोकसभा अविश्वासाचा प्रस्ताव संमत करून मंत्रिमंडळाला राजीनामा द्यायला लावू शकते. - 50 सदस्यांचे समर्थन आवश्यक.

⑨ **निंदाव्यंजक प्रस्ताव**

अविश्वासाच्या प्रस्तावापेक्षा खालील बाबतीत भिन्न.

1) हा प्रस्ताव मांडण्याची कारणे देणे आवश्यक. ⟶ अविश्वास ठराव - नाही.

2) मंत्र्याविरुद्ध / मंत्रीगट / मंत्रीमंडळाविरुद्ध ⟶ फक्त मंत्रिमंडळाविरुद्ध

3) धोरणे व कृती त्यावर दोषारोप करण्यासाठी ⟶ लोकसभेवर अविश्वास दाखविण्यासाठी

5) संमत झाल्यावर मंत्रिमंडळाने राजीनामा देण्याची आवश्यकता नसते ⟶ राजीनामा द्यावाच लागतो.

⑩ **आभार प्रदर्शक प्रस्ताव**

सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या पहिल्या अधिवेशनाला व प्रत्येक आर्थिक वर्षातील पहिल्या अधिवेशनाला राष्ट्रपती आभारप्रदर्शक ठराव मांडतात तो संमत होणे आवश्यक अन्यथा सरकारचा पराभव.

⑪ **हरकतीचा मुद्दा.**

ज्यावेळी गृहातील कामकाज नेहमीच्या नियमानुसार होत नाही त्यावेळी सदस्य हरकतीचा मुद्दा उपस्थित करू शकतो. (सरकारवर नियंत्रण ठेवण्यासाठी - विरोधी सदस्य) गृहाचे कामकाज प्रलंबित होते - त्यावर चर्चा होत नाही.

⑫ **अर्ध्या तासाची चर्चा**

अपुरे चर्चा झालेल्या विषयाच्या तथ्यांसाबाबत स्पष्टीकरणाची आवश्यकता असलेल्या विषयांसाठी - ही चर्चा.

आठवड्यातील 3 दिवस देऊ शकतो. - औपचारिक ठराव किंवा मतदान नसते

⑬ **अल्पकालीन चर्चा**

कालावधी दोन तासापेक्षा जास्त नसल्याने याला दोन तासांची चर्चा असेही म्हटले जाते. ही पद्धत 1953 पासून - महत्वाच्या जनहिताच्या प्रश्नावर - ठराव किंवा मतदान नसते. आठवड्यातील दोन दिवस देऊ शकतो.

⑭ **विशेष उल्लेख** - कोणत्याही नियमात न बसणारे : नियम 377 अंतर्गत

Scanned by CamScanner

## ठराव :

सार्वजनिक हिताच्या सर्वसाधारण बाबींकडे गृहाचे / सरकारचे लक्ष वेधण्यासाठी सदस्य हा ठराव मांडू शकतात.

ठराव मांडणारा किंवा त्यात दुरुस्ती सुचविणारा सदस्य गृहाच्या परवानगीशिवाय ठराव किंवा दुरुस्ती मागे घेवू शकत नाही.

प्रकार ③ · ① खाजगी सदस्याचा ठराव · — एक आड एक शुक्रवारी - दुपारच्या सत्रात चर्चा.
② सरकारी ठराव · — मंत्र्यांने मांडलेला - सोमवार ते गुरु कधीही चर्चा.
③ वैधानिक ठराव — मंत्री / खाजगी सदस्य - घटनेच्या तरतुदीनुसार.

⟹ सर्व ठराव हे कोणत्या तरी प्रकारचे प्रस्ताव असतात, सर्व प्रस्ताव ठराव नसतात.
प्रस्तावावर मतदान घेतले जाईलच असे नाही
ठरावावर मतदान घेतलेच जाते.

**युवा संसद** — चौथ्या अखिल भारतीय प्रतोद परिषदेच्या शिफारशीनुसार
गणपातळीवर संसदेची पद्धत व प्रक्रिया यांची माहिती व्हावी या उद्देशाने.
अंमलबजावणीसाठी संसदीय कामकाज मंत्रालय आवश्यक ते प्रशिक्षण देते

## संसदेतील कायदे विषयक प्रक्रिया :

दोन्ही गृहात समान : / प्रक्रिया एकच.
विधेयक - प्रस्तावित कायदा.

**विधेयके** ⟶ दोन प्रकारची · ① सार्वजनिक विधेयक (सरकारी) ② खाजगी विधेयक.

| सार्वजनिक | खाजगी · |
| --- | --- |
| ① मंत्री सादर करतो | मंत्री सोडून अन्य सदस्य सादर करतात. |
| ② सरकारचे धोरण व्यक्त होते. | सार्वजनिक मुद्याबाबत विरोधी पक्षाची भूमिका |
| ③ संमत होण्याची शक्यता जास्त | शक्यता कमी. |
| ④ असंमत झाल्यास मंत्रिमंडळास राजीनामा द्यावा लागू शकतो. | असंमत होण्याने मंत्रिमंडळावर परिणाम नाही. |
| ⑤ मांडण्यासाठी ७ दिवसांची सूचना द्यावी लागते. | एक महिन्याची सूचना द्यावी लागते. |
| ⑥ विधी खात्याशी विचारविनिमय करून खाते मसुदा तयार करते. | मसुदा बनविण्याची जबाबदारी सदस्याची |

Scanned by CamScanner

16

## विधेयकाचे चार प्रकार

① सर्वसाधारण विधेयक ⇒ वित्तीय विषय सोडून इतर कोणत्याही विषयाबंधी
② अर्थ विधेयक → कर, सार्वजनिक खर्च अशा आर्थिक —॥—
③ वित्तीय विधेयक → आर्थिक विषयाशी संबंधीत - अर्थ विधेयकापेक्षा भिन्न
④ घटनादुरुस्ती विधेयक ⇒ घटनेच्या दुरुस्तीसंबंधी.

## सर्वसाधारण विधेयक - पाच टप्प्यातून जाते.

### पहिले वाचन -

① कोणत्याही गृहात सादर
② मंत्री किंवा कोणताही सदस्य.
③ विधेयक सादर करणाऱ्या सदस्याला गृहाची अनुमती घ्यावी लागते.
④ शीर्षक व उद्देश वाचतो ⟶ प्रथम वाचन.
⑤ चर्चा होत नाही.
⑥ विधेयक भारतीय राजपत्रात प्रसिद्ध होते. - सादर करण्यापूर्वी राजपत्रात प्रसिद्ध झाले असल्यास गृहाच्या अनुमतीची आवश्यकता नाही.
⑦ विधेयक सादर करणे किंवा राजपत्रात प्रसिद्ध होणे हे पहिले वाचन.

### दुसरे वाचन —

① सर्वसाधारण व तपशीलवार परिक्षण व अंतिम स्वरूप मिळते त्यामुळे कायदा बनण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा टप्पा. तीन उपटप्पे.

अ) सर्वसाधारण चर्चा ⇒ मुद्रित प्रती सर्व सदस्यांना वितरीत केल्या जातात तत्वांवर चर्चा (सर्वसाधारण) तपशीलवार नाही

या टप्प्यात गृह खालीलपैकी एक कृती करते.
① लगेच किंवा इतर दिवशी विचारविनिमयासाठी घेऊ शकतो.
② गृहाच्या चिकित्सा समितीकडे पाठवले जाते.
③ दोन्ही गृहाच्या समिती (संयुक्त) कडे पाठवले जाते.
④ लोकमत आजमावण्यासाठी प्रसृत केले जाते.

( चिकित्सा समितीत ज्या गृहात विधेयक मांडले त्या गृहाचे सदस्य असतात तर संयुक्त समितीमध्ये दोन्ही गृहाचे सदस्य )

ब) समिती :- चिकित्सा समितीत तपशीलवार सखोल परिक्षण मुद्देनिहाय व सदस्यांना मतानुसार बदल करू शकतो. चर्चा झाल्यावर परत गृहाकडे पाठवते.

क) विचारविनिमय — गृह प्रत्येक कलमातील मतानुसार विचारविनिमय करते. प्रत्येक कलमावर चर्चा व मतदान होते.

Scanned by CamScanner

सदस्य दुरुस्त्या सुचवू शकतात (स्वीकारल्या तर विधेयकाचा भाग बनतात. 

## तिसरे वाचन

या टप्प्यावर दुरुस्ती सुचवता येत नाही. संमत करावे की असंमत करावे या पुरती चर्चा मर्यादित - बहुमताने (उपस्थितांच्या) विधेयकाच्या बाजूने मतदान केले तर विधेयक त्या गृहात संमत होते. गृहाच्या अध्यक्षाकडून प्रमाणित होते व संमतीसाठी दुसऱ्या गृहाकडे पाठवले जाते.

## दुसऱ्या गृहामध्ये विधेयक

तीन टप्पे - प्रथम, द्वितीय व तृतीय वाचन.

गृहापुढे चार पर्याय ⟶

① पहिल्या गृहाने पाठवलेले विधेयक संमत करणे - (दुरुस्ती न करता)
② दुरुस्त्या करून विधेयक संमत करणे व पुनर्विचारासाठी पहिल्या गृहाकडे पाठवणे.
③ विधेयक पूर्णत: असंमत करणे.
④ काहीही कृती न करता विधेयक प्रलंबित ठेवणे.

① संमत केले.
② दुरुस्त्या पहिल्या गृहाने संमत केल्या ] संमत मानण्यात येवून राष्ट्रपतीकडे.

① दुसऱ्या गृहाने सुचविलेल्या दुरुस्त्या पहिल्या गृहाने असंमत केल्या
② दुसऱ्या गृहाने विधेयक पूर्णत: असंमत केले किंवा सहा महिने काहीही कृती केली नाही
} तर संयुक्त बैठकीचे प्रयोजन. दोन्ही गृहातील सदस्यांच्या बहुमताने निर्णय.

## राष्ट्रपतीची संमती

तीन पर्याय ⟶
① विधेयक संमत करू शकतो. ⟶ कायदा बनतो
② संमती देणे राखून ठेवू शकतो. ⟶ शेवट होतो
③ पुनर्विचारार्थ गृहाकडे पाठवू शकतो. ⟶ परंतु दुरुस्त्या करून किंवा दुरुस्त्याशिवाय आलेले विधेयक संमत करावेच लागते

## अर्थ विधेयक

कलम 110 अर्थ विधेयकाची व्याख्या.

त्यामध्ये -
① कोणत्याही कराची आकारणी, रद्द करणे, सूट देणे, बदल करणे, नियमन करणे.
② कर्ज घेण्याचे नियमन करणे.
③ संचित निधी व आकस्मिक निधी सुरक्षित राखणे.
④ संचित निधीचा विनियोग करणे - खर्च करणे / वाढ करणे - घोषणा.
⑤ संचित / सार्वजनिक निधी वापर संदर्भात केंद्र व राज्याच्या लेख्यांचे परिक्षण.

Scanned by CamScanner

खालील बाबींची तरतूद असलेले विधेयक अर्थ विधेयक ठरत नाही.

① आर्थिक दंड आकारणे.
② परवाना शुल्क, त्याची मागणी, सेवेसाठीचे शुल्क संबंधी
③ स्थानिक प्राधिकरणाने कोणताही कर आकारणे, रद्दकरणे, सूट देणे, बदल इ.

एखादे विधेयक धन विधेयक आहे की नाही - अंतिम निर्णय - लोकसभा सभापती याबाबतच्या निर्णयाविरुद्ध संसद/न्यायालय/राष्ट्रपती कडे दाद मागता येत नाही.

अर्थ विधेयक सभापती प्रमाणीत करतात.

अर्थविधेयक → केवळ लोकसभेत
→ केवळ राष्ट्रपतीच्या पूर्वपरवानगीनेच
→ केवळ मंत्रीच
} मांडले जाते.

⇒ लोकसभेने संमत केल्यावर विचारविनिमयासाठी राज्यसभेकडे - अधिकार मर्यादित असंमत करू शकत नाही / दुरुस्तीही करू शकत नाही. केवळ शिफारशी करू शकते.

⇒ १४ दिवसाच्या आत लोकसभेकडे परत पाठवले पाहिजे -

⇒ लोकसभा काही किंवा सर्व शिफारशी मान्य/अमान्य करू शकते.

⇒ शिफारशी स्विकारल्या तर - विधेयक दोन्ही गृहात संमत केले असे मानले जाते.
नाही स्विकारल्या तरीही

⇒ राज्यसभेने १४ दिवसात लोकसभेकडे परत पाठवले नाही तर लोकसभेने सुरुवातीला संमत केलेले विधेयक दोन्ही गृहांनी संमत केले असे मानले जाते.

⟶ राष्ट्रपतीकडे संमती साठी गेल्यावर ⟶ ① संमती देऊ शकतो.
② संमती राखून ठेवू शकतो
③ पुनर्विचारार्थ पाठवू शकत नाही.

## वित्त विधेयक

महसूल व खर्च या वित्त विषयक बाबीसंबंधीच्या विधेयकांना वित्त विधेयक म्हणतात

३ प्रकार ⟹ अर्थ विधेयक — ११० (कलम)
वित्त विधेयक I — कलम ११७ (१)
वित्त विधेयक II → कलम ११७ (३)

→ अर्थ विधेयक वित्त विधेयकाचाच एक प्रकार आहे.
त्यामुळे सर्व अर्थ विधेयके वित्त विधेयके असतात परंतु
सर्व वित्त विधेयके अर्थ विधेयके नसतात.

१ वित्त विधेयक I ⟹
ज्या विधेयकामध्ये अर्थ विधेयकासंबंधी सर्व किंवा काही मुद्दे नसेच त्या व्यतिरिक्त सर्वसाधारण कायद्याचेही मुद्दे आहेत त्यांना वित्त विधेयक I म्हटले जाते.

अर्थविधेयक व वित्तीय विधेयक I यामधील साम्य.

① सादर फक्त लोकसभेत

② राष्ट्रपतीच्या शिफारशीनुसारच.

मात्र इतर सर्व बाबतीत प्रक्रिया सर्वसाधारण विधेयकाप्रमाणे — वित्तीय विधेयक I

(त्यामुळे राज्यसभा असंमत करू शकते, किंवा दुरुस्ती करू शकते) — मतैक्य न झाल्यास

संयुक्त बैठक →

राष्ट्रपतीकडे गेल्यावर संमती देवू शकतात / राखून ठेवू शकतात / पुनर्विचारार्थ पाठवू शकतात.

वित्तविधेयक क्र. II -

संचित निधीतून खर्चाच्या संबंधीच्या तरतुदी तथापि कलम ११० मधील कोणताही

विषय त्यामध्ये नसतो. —

विधीप्रक्रिया — सर्वसाधारण विधेयकाप्रमाणे. (~~मात्र~~ .

कोणत्याही गृहात मांडता येते.

राष्ट्रपतीची शिफारस आवश्यक नाही.

कोणतेही गृह विधेयक असंमत करू शकते / दुरुस्ती करू शकते.

संयुक्त बैठकीचे नियोजन.

राष्ट्रपती संमत / संमती राखून ठेवू शकतो / पुनर्विचारार्थ पाठवू शकतो.

संयुक्त बैठक

⇒ कोंडी तोडण्यासाठी.

① विधेयक असंमत —

② दुरुस्त्याबाबत —

③ दुसऱ्या गृहाने सहा महिन्यांच्या आत विधेयक संमत केले नाही.

—

* ही व्यवस्था फक्त सर्वसाधारण व वित्तीय विधेयकासाठी. / अर्थविधे. दुरुस्ती विधेयकासाठी नाही.

* सहा महिन्याचा कालावधी मोजताना जर दुसरे गृह सलग चार दिवस वरसत्र असेल तर तो

कालावधी मोजला जात नाही.

* अध्यक्ष → लोकसभा सभापती — उपसभापती — राज्यसभेचा उपाध्यक्ष — सदस्य ठरवतील तो.

* गणपूर्ती → १/१० सदस्य

* कामकाज → लोकसभेच्या नियमानुसार (राज्यसभेच्या नाही.)

१९५० पासून संयुक्त बैठक फक्त तीनदा — ① हुंडा प्रतिबंधक विधेयक — १९६० (१९६१)

② बँकिंग सेवा आयोग विधेयक — १९७७ (१९७८)

③ दहशतवाद प्रतिबंधक विधेयक — २००२ (२००२)

Scanned by CamScanner

## संसदेमध्ये अर्थसंकल्प

घटनेत → वार्षिक वित्तीय पत्रक असा उल्लेख:

कलम - ११२ - १ एप्रिल ते ३१ मार्चला संपणाऱ्या आगामी आर्थिक वर्षात सरकारच्या जमा व खर्चाचे अंदाजपत्रक

खालील बाबींचा समावेश :

① महसुली आणि भांडवली जमेचे अंदाज
② महसूल उभारण्याचे मार्ग व योजना
③ खर्चाचे अंदाज
④ प्रत्यक्ष जमा व खर्चाचे तपशील आणि तुटीची व शिल्लकीची कारणे
⑤ आर्थिक व वित्तीय धोरणे – कर प्रस्ताव, महसुलाचा अंदाज, खर्चाचे कार्यक्रम, नवीन योजना प्रकल्प सुरु करणे.

२०१६ पर्यंत ⇒ दोन अर्थसंकल्प ① सर्वसाधारण अर्थसंकल्प ② रेल्वेचा अर्थसंकल्प.

ॲकवर्थ समितीच्या शिफारशीनुसार: १९२१ मध्ये रेल्वेचा अर्थसंकल्प सर्वसाधारण अर्थसंकल्पापासून वेगळा करण्यात आला.

ऑगस्ट २०१६ मध्ये पुन्हा रेल्वेचा अर्थसंकल्प पुन्हा सर्वसाधारण अर्थसंकल्पात विलीन करण्याचा निर्णय. त्यानुसार २०१७ पासून अंमलबजावणी.

## घटनात्मक तरतुदी

① प्रत्येक वर्षासाठी भारत सरकारचे जमा व खर्चाचे अंदाजपत्रक संसदेच्या दोन्ही गृहांना सादर करावे असे राष्ट्रपती सुनिश्चित करतील
② राष्ट्रपतींच्या शिफारशीशिवाय कोणतेही अनुदान मागता येणार नाही.
③ कायद्याने निर्धारित केल्याशिवाय संचित निधीतून कोणतेही पैसे काढता येणार नाही.
④ राष्ट्रपतींच्या शिफारशी शिवाय कर आकारण्याचे कोणतेही अर्थ विधेयक संसदेत सादर करता येणार नाही.
⑤ कायदेशीर अधिकाराशिवाय कोणताही कर आकारता येणार नाही किंवा स
⑥. संसद कर कमी करू शकते किंवा रद्द करू शकते पण वाढवू शकत नाही.

### यासंदर्भात दोन्ही गृहाची भूमिका -

① अर्थविधेयक किंवा करासंबंधीचे वित्त विधेयक राज्यसभेत सादर केले जाणार नाही
② राज्यसभेला अनुदानावर मतदान करण्याचा अधिकार नाही.
③ खर्चाची संचित निधीवरील भारीत खर्च व संचित निधीतून केला जाणारा खर्च अशी स्वतंत्र विभागणी.

Scanned by CamScanner

④ महत्वाचे खर्च इतर खर्चापेक्षा वेगळा दाखवला जाईल.

**संचित निधीवरील आरिग खर्च:**

→ यावर संसदेत मतदान होत नाही. केवळ चर्चा होते.

⇒ भारत सरकारचे शामिल असलेल्या ऋणासंबंधित खर्च त्यामध्ये व्याज राखीव निधी परतफेडीवरील खर्च इ. समावेश.

⇒ न्यायालय किंवा लवादाचे निर्णय/आदेश/निकाल अंमलात आणण्यासाठी लागणारा खर्च.

→ संसदेद्वारा ठरविला जाणारा इतर खर्च.

**अर्थसंकल्प मंजूर करण्यातील टप्पे:**
① अर्थसंकल्प मांडणे. – १ फेब्रु (२०१७ पासून)
② सर्वसाधारण चर्चा
③ विभागीय समित्यांकडून परिक्षण
④ अनुदानावर मतदान
⑤ विनियोग विधेयक संमत करणे.
⑥ वित्त विधेयक संमत करणे.

सर्वसाधारण अर्थसंकल्पामध्ये एकूण १०९ मागण्या (१०३ नागरी खर्च व ६ संरक्षण खर्च)
रेल्वे ——〃—— ३२ मागण्या असतात.

**इतर अनुदाने** —
① पूरक अनुदान
② अतिरिक्त अनुदान
③ जादा अनुदान
④ जमा अनुदान
⑤ अपवादात्मक अनुदान
⑥ टोकणिक अनुदान

**निधी** —
① संचित (२६६)
② सार्वजनिक लेखा (२६६)
③ आकस्मिक (२६७)

//

# संसदेची बहुकार्यिक भूमिका

## ① कायदेविषयक अधिकार व कार्ये

① कायदे करणे :- केंद्रसूचीतील ९८ व इतर उर्वरित विषय — फक्त संसदेला
समवर्ती सूचीच्या संदर्भात संसदेला श्रेष्ठ अधिकार;

खालील ५ स्थितीत राज्यसूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार संसदेला—

① जेव्हा राज्यसभा तसा ठराव संमत करते.
② जेव्हा राष्ट्रीय आणिबाणी लागू असते.
③ दोन किंवा अधिक राज्ये संसदेला तशी विनंती करतात.
④ आंतरराष्ट्रीय करार आणि संकेत याची अंमलबजावणी करण्यासाठी.
⑤ जेव्हा राज्यात राष्ट्रपती शासन लागू असते.

## ② कार्यकारी अधिकार व कार्ये

प्रश्नोत्तराचा तास, शून्य प्रहर, अध्यक्षांसाची चर्चा, अल्पकालीन चर्चा, लक्षवेधी प्रस्ताव, स्थगन प्रस्ताव, अविश्वास ठराव, निंदाव्यंजक ठराव व इतर चर्चा या द्वारा संसद कार्यकारी विभागावर नियंत्रण ठेवते.

## ③ आर्थिक अधिकार व कार्ये

① अर्थसंकल्पाचा कायदा संमत करणे.
② संमतीशिवाय कर आकारता येणार नाही किंवा संकलित करता येणार नाही.

संसदेचे दोन स्तरावर नियंत्रण
① अर्थसंकल्पीय नियंत्रण
② अर्थसंकल्पोत्तर नियंत्रण.

अर्थसंकल्पात मंजूर निधी वर्षाच्या अखेरपर्यंत खर्च झाला नाही तर उरलेला निधी लोप पावतो आणि संचित निधीत परत जातो याला लोप पावण्याचा नियम म्हणतात. आर्थिक वर्षाच्या अखेरीस घाईने खर्च केला जातो याला मार्चची घाई म्हणतात.

## ④ घटनात्मक अधिकार व कार्ये

घटनादुरुस्तीचा अधिकार संसदेला.

① विशेष बहुमताने दुरुस्ती ⇒ ✱ दोन्ही गृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या ५०%पेक्षा जास्त मतांनी उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या २/३ मतांनी

② साध्या बहुमताने ⇒ उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने.

③ संसदेचे विशेष बहुमत + निम्म्या पेक्षा अधिक राज्य विधिमंडळाची संमती (साधे बहुमत)

या तिन्ही बाबतीत घटनादुरुस्ती प्रक्रिया सुरू करण्याचा अधिकार केवळ संसदेला राज्य विधिमंडळाला नाही. (अपवाद → राज्य विधिमंडळ संसदेला विधान परिषद स्थापन करण्याची / रद्द करण्याची विनंती करू शकते)

## ⑤ न्यायिक व अन्य अधिकार व कार्ये

① राष्ट्रपतीवर महाभियोग चालवणे
② उपराष्ट्रपतीला पदच्युत करणे
③ सर्वोच्च न्याया. आणि उच्च न्याया. न्यायाधीश, मुख्य निवडणूक आयुक्त, महालेखापरीक्षक यांना

Scanned by CamScanner

पदच्युत करण्याची शिफारस राष्ट्रपतीला करू शकते.

## निवडणूका संदर्भातील अधिकार आणि कार्ये

संसद राष्ट्रपतीच्या निवडणूकीत सहभागी होते
तसेच उपराष्ट्रपतीच्या —॥—
सभापती / उपसभापती / उपाध्यक्ष निवड
राष्ट्रपती / उपराष्ट्रपती निवडणूक कायदा – 1952
लोकप्रतिनिधी कायदा 1950 व 1951

## इतर अधिकार

① आणिबाणींना मान्यता देणे
② राज्य विधान परिषद स्थापन करणे किंवा बरखास्त करणे.
③ राज्यांचे क्षेत्र बदलणे, सीमांत बदल व नावात बदल इ. अधिकार.
④ दोन किंवा अधिक राज्यांसाठी संयुक्त उच्च न्यायालय स्थापन करू शकते.

## ① राज्यसभा व लोकसभा समान दर्जा.

① सर्वसाधारण विधेयक
② घटनादुरुस्ती विधेयक
③ वित्तीय विधेयक II
④ राष्ट्रपती निवडणूक व महाभियोग
⑤ अध्यादेशांना संमती.
⑥ आणिबाणीला संमती देणे.

## ② समान दर्जा नाही.

① अर्थविधेयक संदर्भात.
② वित्तीय विधेयक I
③ संयुक्त बैठक संदर्भात.
④ अर्थसंकल्पावर चर्चा करू शकते. अनुदान मागणीवर मतदान करू शकत नाही.
⑤ राष्ट्रीय आणीबाणी समाप्त करण्याचा ठराव केवळ लोकसभा संमत करू शकते
⑥ अविश्वास ठराव.

## ③ राज्यसभेस विशेष अधिकार

① राज्यसूचीतील विषयावर कायदे करण्याचा अधिकार लोकसभेला देऊ शकते. (कलम 249)
② केंद्र व राज्य यांना समान असलेली नवीन अखिल भारतीय सेवा निर्माण करण्याचा अधिकार (312)

## संसदीय विशेषाधिकार

म्हणजे दोन्ही गृहांना, त्यांच्या समित्यांना, आणि सदस्यांना असलेले विशेष हक्क, संरक्षण आणि सवलती होय. हे अधिकार सदस्य तसेच महान्यायवादी यांना. मात्र राष्ट्रपतींना नाहीत.

Scanned by CamScanner

कर्गीकरण ⇒ ① गृहाचे संयुक्त विशेषाधिकार
② सदस्यांचे व्यक्तिगत विशेषाधिकार.

① संयुक्त विशेषाधिकार →

* संसदेला आपला अहवाल, चर्चा आणि कामकाज प्रकाशित करण्याचा अधिकार तसेच इतरांना प्रकाशित करण्यावर प्रतिबंध घालण्याचा अधिकार.
* गुप्त बैठक घेवू शकते.
* विशेषाधिकाराचा भंग केल्यास किंवा संसदेचा अवमान केल्यास संसद आपल्या सदस्यांना तसेच इतरांना ताकीद देवून, सूचना देवून, तुरुंगवास देवून, निलंबित करून सदस्यत्व रद्द करून शिक्षा करू शकते.
* न्यायालयांना गृहाच्या किंवा त्याच्या समित्यांच्या कामकाजाची चौकशी करण्याचा अधिकार नाही.

② व्यक्तिगत विशेषाधिकार

* संसदेचे अधिवेशन चालू असताना किंवा सुरु होण्यापूर्वी ४० दिवस किंवा संपल्यावर ४० दिवस या कालावधीत संसद सदस्याला अटक करता येत नाही.
हा विशेषाधिकार केवळ दिवाणी खटल्याबाबत – फौजदारी खटले किंवा प्रतिबंधात्मक व्यवस्थेने संबंधित नाही.
* संसदेत भाषणस्वातंत्र्य ⇒ संसदेत किंवा संसदेच्या समित्यामध्ये केलेल्या वक्तव्याबद्दल किंवा केलेल्या मतदानाबद्दल सदस्याविरुद्ध कोणतीही कारवाई करता येत नाही.
* न्याय सेवेपासून सूट → अधिवेशन चालू असताना ते खटल्यामध्ये पुरावे देण्यास किंवा साक्षीदार म्हणून उपस्थित राहण्यास नकार देवू शकतात.

संसदेतील जागांची विभागणी

सध्या लोकसभेत एकूण सदस्य - ५४५ (५३०+१३+२)
सर्वाधिक सदस्य ⇒ उ.प्रदेश — ८० दिल्ली = ०७ - ०
*राज्यसभेतील सर्वात कमी सदस्य → माणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड, सिक्कीम, त्रिपुरा ⇒ १
महाराष्ट्र सदस्य ⇒ ४८.
सध्या राज्यसभेत एकूण सदस्य २४५ (२३३+१२)
. सर्वाधिक → उ.प्रदेश = ३१ . दिल्ली - ०३
(लोकसभेतील) सर्वात कमी सदस्य = मिझोराम नागालँड सिक्कीम.
महाराष्ट्र ⇒ १९

→ लोकसभांचा कालावधी

① पहिली - १९५२-५७
② दुसरी - १९५७-६२
③ तिसरी - १९६२-६७
④ चौथी - १९६७-७०
⑤ पाचवी - १९७१-७७. कार्यकाळ वाढवियात आला
⑥ सहावी - १९७७-७९

Scanned by CamScanner

(७) सातवी – १९८०-८४
(८) आठवी – १९८४-८९
(९) नववी – १९८९-९१
(१०) दहावी – १९९१-९६
(११) अकरावी १९९६-९७
(१२) बारावी १९९८-९९
(१३) तेरावी १९९९-२००४
(१४) चौदावी २००४-२००९
(१५) पंधरावी २००९-२०१४

सोळावी लोकसभा सध्या – अस्तित्वात २०१४ पासून.

## घटक १७ संसदीय समित्या

* गृहाने निवडलेली किंवा सभापती किंवा अध्यक्षाने नामनिर्देशित केलेली असते.
* सभापती / अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली काम
* समिती सभागृह / सभापती / अध्यक्ष यांना अहवाल सादर करते.

प्रकार दोन : १) स्थायी समिती २) अस्थायी समिती. — (तदर्थ / तात्पुरत्या)
↳ दरवर्षी किंवा ठराविक कालाने स्थापन केल्या जातात.

स्थायी समिती: सहा प्रकार.

① वित्तिय समित्या : १) लोकलेखा समिती
२) अंदाज समिती
३) सार्व. उपक्रम समिती.

② विभागिय स्थायी समित्या (२४)

③ चौकशी समित्या १) आवेदन समिती
२) विशेषाधिकार समिती
३) नितीमत्ता समिती.

④ परिक्षण व नियंत्रण समित्या

⑤ दैनंदिन कामकाज समित्या.

⑥ सेवा समित्या.

*** लोकलेखा समिती

भारत सरकार कायदा १९१९ नुसार – १९२१ मध्ये स्थापना.
सदस्य – २२ (लोकसभेतील १५ व राज्य सभेतील ७ सदस्य)
निवड – संसदेकडून (एकल संक्रमणीय प्रमाणशीर मतदान तत्व)
कार्यकाळ – १ वर्ष.
मंत्री सदस्य नसतो
सभापती अध्यक्षांची नियुक्ती करतात. १९६६-६७ पर्यंत सत्ताधारी पक्षाचा त्यानंतर विरोधीपक्षाचा.
काम ⇒ भारताच्या नियंत्रक व महालेखापरिक्षकाच्या लेखा परिक्षण अहवालाचे परिक्षण करणे

* अंदाज समिती

स्थापना – १९५० मध्ये जॉन मथाई (तत्कालीन अर्थमंत्री) यांच्या शिफारशीने

Scanned by CamScanner